उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभागातील
अधिसंख्यानाशी सर्व तंत्र शिक्षण संस्थांमधून
"विशेष मागास प्रवर्गाकरिता" राखीव जागा
ठेवण्याबाबत

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन शुध्दिपत्रक क्रमांक विप्रान ३३९५/(१४०७)/(६९४०) तांशि १
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२
दिनांक २१ मार्च, १९९६

संदर्भ :—(१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग
क्रमांक : युतुगजी १४९३/(२४२८) तांशि–४
दिनांक २२ जून, १९९५

शासन शुध्दिपत्रक :—

संदर्भाधीन दिनांक २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयान्वये शासकीय/अनुदानित/विद्यापीठ व्यवस्थापित/विना अनुदानित संस्थांतील अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र/औषधनिर्माण शास्त्र या व्यवस्थापन शास्त्र इत्यादी व्यावसायिक विद्याशाखांच्या पदवी/पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश करण्यासाठी मागासवर्गीयांकरिता आरक्षणाचे प्रमाण शासनाने यापूर्वीच खालीलप्रमाणे विहित केले आहे

| | |
|---|---|
| (१) अनुसूचित जाती व अनुसूचित जातींतील बौद्ध धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३ टक्के |
| (२) अनुसूचित जमाती | ७ टक्के |
| (३) विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) | ३ टक्के |
| (४) भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती) | २.५ टक्के |
| (५) भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) | ३.५ टक्के |
| (६) भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | २ टक्के |
| (७) इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) | १९ टक्के |
| (८) विशेष मागासवर्गीय प्रवर्ग (एस.बी.सी.) | २ टक्के |
| एकूण | ५२ टक्के |

संदर्भाधीन दिनांक २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४, ५ व ६ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :–

१. परिच्छेद क्र. ४ :—उपरोक्त आरक्षण प्रत्येक संस्थेत अभ्यासक्रमनिहाय असेल व ज्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश पद्धतीत मुक्त व मुल्यावरील स्वतंत्र जागा असतील त्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रत्येक प्रकाराला त्या त्या प्रमाणात लागू राहील.

परिच्छेद क्र. ५ :—संवर्गनिहाय आरक्षित जागा प्रथमतः भरण्यात याव्यात. एखाद्या मागासवर्गीय संवर्गातून उमेदवार उपलब्ध नसतील तर त्या संवर्गातील रिक्त जागा इतर संवर्गांच्या एकत्रित यादीतील गुणवत्तानुक्रमानुसार पूर्व नियोजित वेळी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांना त्यांच्या निवडीनुसार दुसऱ्या वांगल्या पसंतीच्या जागेवर प्रवेश बदल देण्यासाठी पुनर्विचार करण्यात यावा.

मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागांवर प्रवेश घेतलेले उमेदवार सर्वसाधारण गुणवत्तानुक्रमानुसार खुल्या जागांवरील प्रवेशासाठी देखील पात्र ठरत असल्यास खुल्या जागेवर प्रवेश देताना पूर्वीची संस्था अभ्यासक्रम संबंध अबाधित राहत असेल तर सर्व संबंधितांनी अशा प्रवेशांची समायोजना करण्यात येऊन अशा उमेदवारांना खुल्या जागांवर प्रवेश मिळाला आहे असे समजण्यात यावे. त्यासाठी उमेदवाराने उपस्थित राहण्याची किंवा पसंती/इच्छा कळविण्याचा प्रश्न उद्भवणार नाही. परंतु राखीव जागेवर प्रवेश झाला त्यावेळी स्वतःचे पसंतीनुसार उपलब्ध असलेल्या जागेवर खुल्या संवर्गातून प्रवेश मिळण्यासाठी पुनर्विचार व्हावा अशी इच्छा असेल तर मात्र उमेदवाराने खुल्या जागांसाठी होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेच्या पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार त्याच्या सर्वसामान्य गुणवत्तानुक्रमानुसार उपस्थित राहणे आवश्यक राहील अन्यथा अशा प्रवेश बदलासाठी त्यांचा पुनर्विचार करता येणार नाही.

परिच्छेद क्र. ६ :—मागासवर्गीय उमेदवाराने सर्वसाधारण गुणवत्तानुक्रमानुसार खुल्या जागांसाठी प्रवेश करताना संस्थेत/अभ्यासक्रमात मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण शासन निर्धारित प्रमाणापेक्षा अधिक झाले तर त्यास कोणतीही हरकत राहणार नाही.

२. हे शुध्दिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(ओ. सि. विहाडे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

पुणे विद्यापीठ, पुणे ७

संदर्भ क्र. आरक्षण/४२/१३०
आरक्षण कक्ष
दिनांक ८-५-९६

मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये,/ मान्यताप्राप्त संस्था

महोदय,

वरील शासन निर्णय आपणांकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवीत आहे कळावे.

आपला विश्वासू,
सही/-
उपकुलसचिव,
आरक्षण कक्ष

शु वि मु–५००–३–९६ (९१०)

True copy

M. J. S. Mahavidyalaya * Shrigonda *

PRINCIPAL
M. J. Shinde Mahavidyalaya
Shrigonda, Dist. Ahmednagar

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner